महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६० /२०२३ दि. २५/०४/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतूक उप विभागचे हद्दीत दिनांक ३०/०४/२०२३ ते दिनांक ०२/०५/२०२३ रोजीपावेतो **'साईबाबा मंदिराचा २३ वा वर्धापन दिन'** साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात येते. तसेच उत्सवाचे दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साकेत कडून बाळकुम मार्गे कशेळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा सोसायटी कडे जाणारे कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने लोढा सोसायटी माजिवडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कशेळी कडून बाळकुम मार्गे साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक ३०/०४/२०२३ ते दिनांक ०२/०५/२०२३ रोजी पावेतो १७:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.

CamScanner

– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

<u>**प्रत**</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**</u>
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner